# विवेकानंद कॉलेजचे जेईई मेन्स परीक्षेत यश

**कोल्हापूर :** नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेतलेल्या जेईई मेन्स परीक्षेत विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. विद्यार्थी अथर्व करंबळी याने ९३.४५ पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला.

ज्युनिअर कॉलेजमधील सागर पाटील, अशय पटकारे, ओम माने, ऋतुजा ओऊळकर, राम दरोगा, प्रणाली खाडे, श्रुती पाटील यांनीही यश मिळवले. हे विद्यार्थी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना विज्ञान विभागप्रमुख प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एम. आर. नवले, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. एम. आर. काळेबाग, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा. पी. एन. कांबळे, प्रा. एस. एल. पाटील, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. के. जे. गुजर आदींचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
शनिवार, ४ मे २०२४

# विवेकानंदच्या प्रा. डी. बी. पुजारी यांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजमधील प्रा. डी. बी. पुजारी यांचा सेवानिवृत्ती सत्कार प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आला. मानपत्र, शाल, श्रीफळ देवून पुढील आयुष्यासाठीं सदिच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, सुसंस्कारी विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक करत असतात. एक अभ्यासू प्राध्यापक सेवानिवृत्त होत आहेत, ही महाविद्यालयाच्या दृष्टीने न भरून येणारी हानी आहे. सत्काराला उत्तर देताना प्रा. पुजारी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्थेप्रती ऋणभाव व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा. यु. आर. हिरकुडे यांनी आभार मानले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यामुळेच माझे आयुष्य घडले. यावेळी प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. के. जे. शिंदे, प्रा. अशोक पाटील, प्रा गीतांजली साळुंखे आदी उपस्थित होते.